# लांबी मोजूया

**चला मोजूया :** यशला त्याच्या खोलीत अभ्यासासाठी एक टेबल हवे आहे. भिंतीला लागून ज्या जागेत टेबल ठेवायचे आहे त्या जागेची लांबी यशने छोट्या काठीने मोजली. ती ४ काठ्या आणि थोडी जास्त इतकी भरली.



त्यातल्या त्यात मोठ्या टेबलाची निवड करण्यासाठी यश दुकानात गेला. तिथे त्याने अनेक टेबले पाहिली. जागा मोजलेल्या काठीनेच टेबलांची लांबी मोजली. यश कोणते टेबल निवडेल हे चित्रांवरून ठरव. यशने निवडलेल्या त्यातल्या त्यात मोठ्या टेबलाखालील चौकट रंगव.






२ काठ्या ☐    ३ काठ्या ☐    ४ काठ्या ☐    ५ काठ्या ☐

यशने ५ काठ्या लांबीचे टेबल का निवडले नसेल बरं ?



रमाला तिच्या वर्गखोलीच्या दरवाजावर आणि शाळेच्या गेटवर फुलांचे हार लावायचे आहेत. त्यासाठी तिने जाड दोरा आणून वर्गखोलीच्या दरवाजाची रुंदी व शाळेच्या गेटची लांबी दोऱ्याने मोजली. प्रत्येक हारासाठी दोन विती जास्त लांबी असलेला दोरा कापून घेतला. दोन विती जास्त दोरा का बरं घेतला असेल ?



**हे करून पाहा :** • तुम्हांला शाळेत वर्गखोलीसाठी आणि गेटसाठी तोरण तयार करायला किती दोरा लागेल बरं ?

• इमारत बांधताना बांधकामाच्या ठिकाणी शिक्षकांसोबत/पालकांसोबत जाऊन मापे कशाने आणि कशी घेतात ते पाहा.

TLJE8S